# <u>प्रेसनोट</u>

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे
दि. २७/०७/२०१८

## महावितरण कंपनी ताथवडे शाखा पुणे येथील कनिष्ठ कार्यालयीन सहायकास दहा हजार रूपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडले.

---

यातील तक्रारदार हे बांधकाम व्यावसायिक आहेत. त्यांनी विकसीत केलेल्या इमारतींमधील नवीन वीज मीटर व वीज कनेक्शन संबंधीत ग्राहकांच्या नावावर करणेसाठी ताथवडे येथील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी येथे अर्ज केला होता. सदरचे नवीन मीटर व कनेक्शन ग्राहकांच्या नावावर करून देण्यासाठी ताथवडे येथील कार्यालयीन सहायक गजानन यादव याने तक्रारदार यांचेकडे १०,४००/- रूपये लाचेची मागणी केली होती. सदर बाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयामध्ये तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीची दिनांक २७/०७/२०१८ रोजी पडताळणी केली असता लोकसेवक गजानन यादव याने तक्रारदार यांनी विकसती केलेल्या इमारतींमधील ग्राहकांच्या नावावर वीज मीटर व कनेक्शन करून देण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे १०,४००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती १०,०००/- रूपये लाचेची मागणी करून रक्कम स्विकारली.

त्यावरुन दिनांक २७/०७/२०१८ रोजी सापळा कारवाई केली असता सापळा कारवाईमध्ये लोकसेवक गजानन सुरेश यादव, वय - ३९, कनिष्ठ कार्यालयीन सहायक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी शाखा ताथवडे पुणे याने तक्रारदार यांचेकडून १०,०००/- रूपयांची लाचेची रक्कम महावितररण कार्यालय ताथवडे शाखेसमोर स्विकारल्यावर त्याला रंगेहात पकडण्यात आले असुन त्याचेवर वाकड पोलीस स्टेशन पुणे शहर येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई हि मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. संदीप दिवाण यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याबाबतचे आवाहन श्री. संदीप दिवाण, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे-
दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**
८. **Mobile App - www.acbmaharashtra.net**

( दत्तात्रय भोपकर )
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.